जनसंपर्क कक्ष
17 FEB 2018 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी भविष्याचा वेध घ्यावा

## किशोर पाटील : आरआयटीचा पाचवा पदवीपूर्ती समारंभ उत्साहात

**इस्लामपूर :** भविष्यात भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असणारा देश म्हणून उदयास येणार आहे. देशातील युवकांना रोजगाराच्या अनेक नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. विद्यार्थ्यांनी भविष्याचा वेध घेत स्वतःला तयार करावे, असे आवाहन पुणे येथील के.पी.आय.टी. टेक्नॉलॉजी लि.चे व्यवस्थापकीय संचालक किशोर पाटील यांनी केले.

राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आर.आय.टी.) या स्वायत्त महाविद्यालयाच्या बी.टेक., एम.टेक. आणि एम.बी.ए. या शाखांच्या ५ व्या पदवीपूर्ती समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. आमदार जयंत पाटील व कासेगाव शिक्षण संस्थेचे सचिव आर. डी. सावंत प्रमुख उपस्थित होते. संचालिका डॉ. सुषमा कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना पदवीपूर्तेची शपथ दिली. स्फूर्ती आरगे, अक्षय हंकारे, अर्जुन पवार यांनी मनोगत व्यक्त केले. रजिस्ट्रार राजन पडवळ यांनी आभार मानले.




**इस्लामपूर : आरआयटीच्या पदवीपूर्ती समारंभात बोलताना किशोर पाटील. सोबत आ. जयंत पाटील, प्राचार्य सुषमा कुलकर्णी, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व इतर.**

17 FEB 2018 महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात शुक्रवारपासून 'मून २०१८'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभाग आणि रोटरी क्लब ऑफ करवीर यांच्यावतीने शुक्रवारपासून (ता. ९ फेब्रुवारी) 'मून २०१८' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ११ फेब्रुवारीपर्यंत विद्यापीठाच्या शाहू सिनेट हॉलमध्ये हा कार्यक्रम होणार आहे. रोटरीचे नसीर बोरसदवाला यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

शनिवारी (ता. १० फेब्रुवारी) सकाळी दहा वाजता 'नॅक'चे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उदघाटन होणार आहे. कार्यक्रमास राज्यभरातून ३६ महाविद्यालयातील संघ सहभागी होतील.

बोरसदवाला म्हणाले, 'मून २०१८ या कार्यक्रमात अंमली पदार्थांचा गैरवापर



व व्यापार, महिला आणि लहान मुलांचा व्यापार तसेच आण्विक उर्जेचा सकारात्मक वापर या विषयांवर विचारमंथन होणार आहे. सहभागी महाविद्यालयातील प्रतिनिधी या विषयांवर मनोगत मांडत असताना त्या-त्या देशाचे धोरण सादर करणार आहेत. त्यासाठी विद्यार्थी विविध देशांची वेशभूषा करून सहभागी होणार आहेत. यामध्ये बेळगावचे १४, पुण्यातील ३, हुबळीचा एक, बेंगळुरूचा एक यासह ३६ संघ सहभागी होणार आहेत. विजेत्या संघांना पारितोषिक देण्यात येणार आहे.'

यावेळी राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डीन डॉ. भारती पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 FEB 2018
पुढारी

# ‘मुन-२०१८’ चे शुक्रवारपासून आयोजन

कोल्हापूर : प्रतिनिधी

- ३६ महाविद्यालयीन संघ सहभागी होणार
- सर्वोत्कृष्ट स्पर्धकांना पारितोषक वितरण




शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग आणि रोटरी क्लब ऑफ करवीर यांच्या वतीने मॉडिल युनायटेड नॅशन्स (मुन-२०१८) या मॉक जनरल असेंब्ली विद्यार्थ्यांच्या स्पर्धेचे शुक्रवार (दि.९)पासून आयोजन केले आहे. तीन दिवस असणाऱ्या या स्पर्धेसाठी पुणे, सातारा, बेंगलोर, बेळगांव, हुबळी आदी ठिकाणहून ३६ महाविद्यालयीन स्पर्धक सहभागी होणार आहेत. स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण रविवारी (दि.११) सायंकाळी पाच वाजता शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सिनेट सभागृहात होईल अशी माहिती मंगळवारी झालेल्या पत्रकार परिषदेत रोटरीचे नासिर बोरसदवाडा यांनी दिली.

बोरसदवाडा म्हणाले, ‘मुन २०१८’ स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी (दि.१०) सकाळी नऊ वाजता कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, नॅकचे सल्लागार जगन्नाथ पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी शुक्रवारी (दि.९) नाव नोंदणी केली जाणार आहे. अंमली पदार्थ गैरवापर आणि स्त्री आणि बालकांचा यासाठी होणारा व्यापार तसेच आण्विक ऊर्जेचा सकारात्मक वापर या दोन विषयांवर ही स्पर्धा होणार आहे. प्रत्येक संघात दोन विद्यार्थी सहभागी असणार आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यांचा संघ हा एका देशाचे प्रतिनिधित्व म्हणून भूमीका मांडणार आहे. यासाठी मागील अनेक दिवसांपासून विद्यार्थ्यांची जय्यत तयारी सुरु आहे. समारोप कार्यक्रमात मिस्टर मुन, मिस मुन, बेस्ट टीम परफॉर्ममन्स, बेस्ट परफॉर्मनन्स फॉर एंटरटेनमेंट अशी पारितोषक दिली जाणार आहेत. पत्रकार परिषदेस डॉ. भारती पाटील, विशाल जांभळे, प्रमोद चौगुले, डॉ.प्रकाश पवार आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
17 FEB 2018
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'मॉडेल युनायटेड नेशन्स' ९ पासून

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग व रोटरी क्लब ऑफ करवीरतर्फे ९ ते ११ फेब्रुवारी दरम्यान 'मॉडेल युनायटेड नेशन्स'चे (मून २०१८) आयोजन केले आहे, अशी माहिती रोटेरियन नासीर बोरसदवाला यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली. राजर्षी छत्रपती शाहू सभागृहात १० फेब्रुवारीला सकाळी ९ वाजता त्याचे उद्‌घाटन होईल.

श्री. बोरसदवाला म्हणाले, ''हा उपक्रम विद्यापीठात तिसऱ्यांदा होत आहे. यंदा मूनमध्ये ३६ संघांचा सहभाग असेल. प्रत्येक संघात दोन विद्यार्थ्यांचा समावेश असून ते ३६ देशांचे प्रतिनिधित्व करतील. कोल्हापूर, सातारा, कराड, बेळगाव, बंगळूर येथील विद्यार्थ्यांचा यात सहभाग असणार आहे. ते त्या त्या देशाची वेशभूषा साकारणार आहेत. ९ फेब्रुवारीला त्यांची नाव नोंदणी होऊन १० फेब्रुवारीला अमली पदार्थांचा वापर व गैरवापर, स्त्रिया व बालकांचा व्यापार या विषयावर चर्चा होईल. ११ फेब्रुवारीला आण्विक ऊर्जेचा सकारात्मक वापर विषयावर ऊहापोह केला जाणार आहे. प्रत्येक देशाचे प्रतिनिधी या विषयांवर आपापली मते व्यक्त करणार आहेत.''

ते म्हणाले, ''मूनमध्ये विविध स्पर्धांतील विजेत्यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह दिले जाणार आहे. त्याचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; तर समारोप रोटरी ३१७० चे गव्हर्नर आनंद कुलकर्णी यांच्या उपस्थितीत होणार आहे.'' पत्रकार परिषदेस राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, विशाल जांभळे, दिलीप शेवाळे, प्रमो[illegible] चौगुले उपस्थित होते.

17 FEB 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकशाही प्रक्रियेवर रशियन क्रांतीचा प्रभाव

## दत्ता देसाई : विद्यापीठात विदेशी भाषा व राज्यशास्त्र विभागातर्फे व्याख्यान

कोल्हापूर, ता. ६ : कोणत्याही क्रांतीचा अस्त होत नसतो. ती कधीच अयशस्वी होत नसते. ती मानवी समाजातील अनेक बदलाच्या प्रक्रिया गतिमान करत असते. त्यामुळेच मानवी इतिहासात प्रथमच शोषितांच्या हातात राजकीय सत्ता देणाऱ्या, समतेचे तत्त्व प्रत्यक्षात आणणाऱ्या रशियन क्रांतीचा प्रभाव हा केवळ सोविएत युनियनपुरता मर्यादित नाही. तो एका शतकामधील संपूर्ण जगाच्या लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेवरील प्रभाव आहे, असे मत दत्ता देसाई यांनी आज येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग व राज्यशास्त्र विभागातर्फे 'रशियन क्रांतीची १०० वर्षे : १९१७-२०१७' विषयावर दोन व्याख्यानांचे आयोजन केले होते. याप्रसंगी ते बोलत होते. उद्घाटन मानव्यशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठाता प्रा. डॉ. भारती पाटील यांनी केले.

श्री. देसाई म्हणाले, ''फॅसिझमच्या विरोधातील दुसऱ्या महायुद्धातील महान लढा, जगभरातील राजकीय स्वातंत्र्य लढ्यांना आणि नवमुक्त देशांना प्रत्यक्ष मदत हे रशियाचे ऐतिहासिक कार्य आपल्याला कधीच विसरता येणार नाही. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, जवाहरलाल नेहरू यांच्यावर रशियन क्रांतीचा मोठा प्रभाव होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही समाजवादाच्या विचाराचे महत्व मांडले होते. त्यानंतर वर्ग व जात एकत्र आणून लढा पुकारणाऱ्या दलित पंथर, मागोवा व युक्रांदसारख्या महाराष्ट्रातील संघटनांना क्रांतिकारी वैचारिक दृष्टी ही रशियन क्रांतीतून मिळाली. सामान्य माणसे इतिहास घडवू शकतात हा विश्वास जगभरातील परिवर्तनशील चळवळीला रशियन क्रांतीने दिला.''



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभाग व राज्यशास्त्र विभागातर्फे आयोजित व्याख्यानमालेत बोलताना दत्ता देसाई. शेजारी डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, डॉ. मेघा पानसरे आदी.**

डॉ. भारती पाटील यांनी रशियन राज्यक्रांतीचे ऐतिहासिक महत्व विषद केले. या वेळी रशियन क्रांतीवरील सिर्गेइ अइजेन्स्तेइन या रशियन दिग्दर्शकाचा चित्रपट दाखविण्यात आला. विदेशी भाषा विभागाच्या प्रभारी विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविक केले. राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी अध्यक्षीय समारोप केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 FEB 2018
सकाळ

# विद्यार्थी परिषदेच्या १४ संचालकांची घोषणा

## अध्यक्ष, सचिवसाठी मोर्चेबांधणीस वेग

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी कल्याण मंडळातर्फे विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या पंधरापैकी चौदा संचालकांनी आज घोषणा केली. अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गाचा उमेदवार न मिळाल्याने एक जागा रिक्त राहिली. दरम्यान, विद्यार्थी कल्याण मंडळाच्या अध्यक्ष व सचिवपदासाठी इच्छुक उमेदवारांत मोर्चेबांधणीस वेग येणार आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्यांतर्गत यंदा विद्यापीठ विद्यार्थी परिषदेसाठी एस.टी.चा स्वतंत्रपणे उमेदवार घेणे निश्चित झाले आहे. तत्पूर्वी, एस. टी.चा उमेदवार मिळाला नाही तर तो एससी प्रवर्गातून घेता येत होता. यंदा तिन्ही जिल्ह्यांत एसटीचा उमेदवार न मिळाल्याने परिषदेत चौदा संचालकांची घोषणा झाली आहे, असे मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सांगितले. परिषदेत दत्तात्रय निवृत्ती रावण (यशवंतराव चव्हाण महाविद्यालय), नम्रता नारायण काटवटे (मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज, जि. सातारा), पौर्णिमा भास्कर उपळावीकर (गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली), किशोरी राजू पसारे (कमला महाविद्यालय), अभिषेक दादासाहेब श्रीराम (न्यू कॉलेज), अमित विकास भिसे (आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा), सुमंत हणमंत कदम (चिंतामणराव इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्च, सांगली), ओमकार श्रीकांत रेळेकर (आजरा महाविद्यालय, आजरा), अभिजित राजेश कुंभार (तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, वारणानगर), सत्यम संभाजी पाटील (देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस्‌ अँड सायन्स कॉलेज, चिखली, जि. सांगली), शुभांगी सतीश नलवडे (आर्टस्‌, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर, किर्लोस्करवाडी, जि. सांगली), अक्षय महावीर सूर्यवंशी (यशवंतराव चव्हाण आर्टस्‌ अँड कॉमर्स कॉलेज (उरण-इस्लामपूर, जि. सांगली), विशाल जितेंद्र मांढरे (इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा), अक्षय दिलीप विटकर (गिरीस्थान आर्टस्‌ अँड कॉमर्स कॉलेज, महाबळेश्वर, जि. सातारा) यांचा समावेश आहे.

17 FEB 2018
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शारदाबाई पवार यांचे कार्य आदर्शवत : डॉ. पाटील

## 'स्थानिक राजकारणातील स्त्रिया : शिवाजी विद्यापीठात 'काल व आज' विषयावर कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : 'शारदाबाई पवार यांचे पुणे लोकल बोर्डावर सामाजिक जाणीवेच्या भावनेतून केलेले कार्य आदर्शवत आहे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्रातर्फे 'स्थानिक राजकारणातील स्त्रिया : काल व आज' विषयावर झालेल्या एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. डॉ. पाटील यांनी 'शारदाबाई गोविंदराव पवार यांचे व्यक्तीत्व व पुणे लोकल बोर्डातील कार्य' विषयावर विचार व्यक्त केले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यशाळा झाली.





**कोल्हापूर : शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे कार्यशाळेत बोलताना डॉ. एन. डी. पाटील.**

डॉ. पाटील म्हणाले, ''शारदाबाई १९३८ ला पुणे लोकल बोर्डावर निवडून गेल्या. बोर्डाच्या त्या चौदा वर्षे सदस्या होत्या. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेकांना चांगल्या सामाजिक कामासाठी प्रोत्साहन दिले. लोकल बोर्डाच्या धोरणावर त्यांच्या कार्याचा चांगला ठसा उमटला. अस्पृश्यता निवारणाचे प्रश्न, सामाजिक कार्य, शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. १९३८ ते १९५२ सालापर्यंत लोकल बोर्डाच्या सभागृहावर त्यांच्या कार्य कर्तृत्वाचा व सामाजिक जीवनाचा मोठा प्रभाव होता.''

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ''शारदाबाई पवार अध्यासन हे मातृशक्ती, स्त्रीशक्तीचे प्रतिनिधित्व करणारे आहे. सामाजिक, आर्थिक, मानसिक पातळीवर संघर्ष करीत असताना त्यांनी दूरदृष्टीने प्रशासकीय कामकाज केले. येत्या काळात प्रशासनातील स्त्रियांचा सहभाग वाढविणे ही काळाची गरज आहे.''

या वेळी बुबनाळच्या सरपंच आस्मा जमादार, उपसरपंच सोनाली शहापुरे यांच्यासह सर्व सदस्य महिलांचा कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते गौरव झाला. ज्येष्ठ विचारवंत डॉ. जयसिंगराव पवार, सरोज पाटील, विजया पाटील उपस्थित होते. समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले.

### जातीपातीचा स्पर्श होऊ दिला नाही

डॉ. पाटील म्हणाले, ''शारदाबाई पवार यांना आयुष्यात सातत्याने अडथळ्यांच्या शर्यतीतून जावे लागले. त्यांनी संसाराचा गाडा समर्थपणे निभावताना मुला-मुलींना उच्च शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले. त्यांनी कधीही मुलगा, मुलगी असा भेद केला नाही. मुलींना जीवनाभिमुख शिक्षण मिळावे, ही त्यांची इच्छा होती. त्यासाठी त्या धडपडत होत्या. त्यांनी पुण्यात शिक्षणासाठी न्यायमूर्ती रानडे यांच्या सेवासदनात प्रवेश घेतला. या ठिकाणी सर्व प्रकारचे कौशल्य त्यांना मिळाले. त्या व गोविंदराव पवार दोघे कर्तबगार होते. शारदाबाई पवार यांची ओळख केवळ शरद पवारांची आई अशी करून देणे म्हणजे त्यांच्या अफाट कर्तृत्वावर अन्याय केल्यासारखे होईल. मुलांच्या जडणघडणीत त्यांनी जातीपातीचा कोणताही स्पर्श होऊ दिला नाही.''